# नागरी सहकारी पतसंस्थांच्या लेखापरिक्षणाच्या वर्गवारीचे निकष (६०० गुण)



महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ८१ नुसार मा. निबंधकांनी अधिकृत केलेल्या पॅनलमधील लेखापरिक्षकांकडून पतसंस्थेचे हिशोब प्रत्येक आर्थिक वर्षात तपासून लेखापरिक्षण करून घेण्याची संचालक मंडळाची जबाबदारी आहे. लेखापरिक्षकांची पात्रता, शिक्षण व अनुभव वगैरे बाबतचे नियम सुधारीत सहकारी कायद्यानुसार विशिष्ठ तक्यात समाविष्ठ करण्यात आलेले आहेत. वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणुक आणि लेखापरिक्षणासाठी आकारवयाच्या शुल्काची आकारणी यासंदर्भात पतसंस्थेने आपल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये ठराव करणे आवश्यक आहे. परंतु एखाद्या पतसंस्थेने लेखापरिक्षण जर ३० सप्टेंबर अखेरपर्यंत पुर्ण केले नाही तर, सहकार खात्याकडून त्या संस्थेचे लेखापरिक्षण करून घेण्यात येते. ह्यासाठी प्रत्येक पतसंस्थेने आपल्या पतसंस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करणेसाठी त्या - त्या स्तरावर योग्य ते ठराव वेळेत करुन घेऊन त्यांचे सोपस्कर वेळेपुर्वी करणे आवश्यक आहे. त्यासाठी पतसंस्थेचे संपुर्ण रेकॉर्ड, बॅंकांमधील गुतवणुक / कर्ज प्रमाणपत्र, ताळेबंद व नफा - तोटा पत्रके इत्यादी आवश्यक असणाऱ्या बाबींची पुर्तता लेखापरिक्षण सुरू होण्यापुर्वी करणे आवश्यक आहे.

लेखापरिक्षक हे कायद्याच्या भाषेत ‘लोकसेवक’ असतात. त्यांना प्रामुख्याने पतसंस्थेचे कायदा व उपविधीनुसार हिशोबांच्या पुस्तकांबाबत दाखला देणे, थकीत व बुडीत कर्ज, ताळेबंदाप्रमाणे असेटस्, कर्जांचे दस्ताऐवज, पुस्तके, अंतर्गत व्यवस्था इत्यादी गोष्टी तपासणे बंधनकारक असतात. संस्थेचे ताळेबंद व नफा - तोटा पत्रक प्रमाणित करण्याबरोबर संस्थेच्या कार्यात मार्गदर्शन करण्याची जबाबदारी लेखापरिक्षकांची असते. पतसंस्थेमधील गैरव्यवहार, घोटाळे, अनियमितता शोधून त्यांनी निबंधकास त्यासंदर्भात अहवाल सादर करणे आवश्यक असते. लेखापरिक्षकाने आपल्या कामाची वैधानिकता प्रमाणे जर काम केले नाही तर त्याची जबाबदारी ही दिवाणी स्वरूपाची असते.

नागरी सहकारी पतसंस्थांचे वैधानिक लेखापरिक्षण विशिष्ठ ठोकताळ्यात करणे क्रमपात्र आहे. ज्यामध्ये भांडवल पर्याप्तता, जिंदगीची गुणवत्ता, व्यवस्थापन, उत्पन्न व नफा, लिक्वीडीटी तसेच कार्यपध्दती व नियंत्रण या ६ मुद्यांवर ६०० गुणांचे वर्गीकरण केलेले असते. त्याची जशीच्या तशी माहिती खालीलप्रमाणे :-